जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - २८८ दिनांक २४/०४/२०२१**

## अंमली पदार्थ विरोधी पथक ०२, गुन्हे शाखेची कामगिरी

## ‘‘ जालना येथील ३ पुरुष व ३ महिला आरोपींकडुन २१,६०,००० /- रु कि चा ६८ किलो गांजाचा साठा व इतर ऐवज जप्त

मा.पोलिस आयुक्त पुणे शहर श्री अमिताभ गुप्ता यांनी पुणे शहराचे पोलीस आयुक्त म्हणुन पदभार स्विकारले पासुन त्यांनी पुणे शहरातील टोळी गुन्हेगार, बेकायदेशिर धंदे करणारे,अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट चालविणारे गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश सव पोलीस ठाणे व शाखाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना दिले आहेत.

दिलेल्या आदेशानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील अधिकारी व कर्मचारी हे हडपसर परीसरात पेट्रोलींग करीत असताना दिनांक २४/०४/२०२१ रोजी ०३/५५ वाजण्याचे सुमारास श्रीनाथ वॉशिंग सेंन्टर समोर सार्वजनिक रोडवर,हडपसर,पुणे येथे त्यांना एक इरटिगा गाडी तीचा आरटिओ क्रमांक एम एच २१/बी.एफ/६५४६ संशईत रित्या उभी असलेली दिसली सदर गाडीमध्ये ३ पुरुष व ३ महिला बसलेले होते त्यांचे कडे अंमली पदार्थ विरोधी पथक २ कडील पोलीस निरीक्षक खांडेकर,पोलीस उप-निरीक्षक गवळी व अंमलदार यांनी त्यांना नाव व पत्ते विचारता त्यांनी त्यांची नावे १) दिपक भिमराव हिवाळे वय २३,रा,गोला बांगरी,आंबेडकर पुतळयामागे,ता.जि.जालना २) आकाश सुनील भालेराव वय २७ रा, नुतन वसाहत,आंबड रोड ,जालना ३) आदित्य दत्तात्रय धांडे वय १९ रा, माऊली नगर,आंबड रोड,जालना, ४) हिराबाई संतोष जाधव वय ४० रा, संजयनगर,जुना जालना ५) सरुबाई रतन पवार वय ६५ रा, संजयनगर,जुना जालना ६) पार्वती सुरेश माने वय ५७ रा, संजयनगर,जुना जालना असे असल्याचे सांगीतले एवढया रात्री त्यांचे सदर ठिकाणी येण्याचे कारण विचारता ते सर्वजण उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे दिल्यांने त्यांचे विरुध्द संशय बळावल्याने त्यांच्या इरटिगा कारची झडती घेतली असता कारचे मधील सीटचे खाली पांढ-या रंगाची दोन नायलॉन पोती व मागील सिटचे खाली पांढ-या रंगाची दोन नायलॉन पोती अशी एकुण चार नायलॉन पोत्यांची तोंडे सुतळीने शिवलेली होती , सर्व पोत्यांमध्ये ओलसर झाडपाल्यासारखा पदार्थ असल्याचे जाणवले.त्यानंतर ती पोती न उघडता,बाहेरुन वास घेवुन पाहता, तो वास गांजा सारखा उग्र स्वरुपाचा आल्याने तो गांजा असल्याची खात्री झाली.त्यांना त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी तो संगनमताने विक्री करीता आणल्याचे सांगीतले.सदर गांजाचे वजन केले असता ते ६८ किलो ०५० मिलीग्रॅम इतके भरले असुन बाजारामध्ये त्याची किंमत १३,६०,०००/- इतकी आहे. नमुद ३ महिला व ३ पुरुषांना विरुध्द पोलीस हवालदार ५७०८ प्रशांत बोमादंडी अं.प.वि.प-२ पुणे यांनी फिर्याद दिली असुन त्यांचे कडुन जप्त केलेला अंमलीपदार्थ व इरटिगा कार पोलीस निरीक्षक प्रकाश खांडेकर यांनी जप्त केला आहे. दाखल गुन्हयात आरोपींना अटक करुन हडपसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३१७/२०२१ एन.डी.पि.एस.ॲक्ट कलम८(क),२०(ब) (ii)(क),२९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप-निरीक्षक अमोल गवळी हे करत आहेत.

वरील नमुद कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,अशोक मोराळे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. श्रीनिवास घाडगे, मा.सहा पो आयुक्त,गुन्हे २ श्री लक्ष्मण बोराटे यांचे मार्गदर्शना खाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस निरीक्षक प्रकाश खांडेकर, पो.उप-निरीक्षक अमोल गवळी व पोलीस अंमलदार संतोष देशपांडे,प्रशांत बोमादंडी,चेतन गायकवाड,संतोष जाचक,संदिप शेळके,साहिल शेख,आझीम शेख,महेश साळुंखे,नितीन जगदाळे, दिनेश बास्टेवाड,महिला अंमलदार दिशा खेवलकर,कल्याणी आगलावे. यांनी केली आहे.


MH.21.BF.6546
8339

